**कार्यालयीन परिपत्रक**

क्र. शिवाजी वि./सुरक्षा/२०२२/०१

दि. २१/१२/२२

## कर्मचार्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून परिसर प्रवेश द्वारे सीमित कालावधीत उघडण्याबाबत

सर्व शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांना कळविण्यात येत आहे की, परिसर प्रवेश द्वार क्र. १ (आत व बाहेर) यातून पादचारी व दुचाकी वाहनावरून महामार्ग ओलांडणाऱ्या कर्मचाऱ्यांना अपघाताचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्या अनुषंगाने प्रवेश द्वार क्र. १ वरील वाहतुकीचा भार कमी करण्याच्या हेतूने, **कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी**,

1. महामार्गावरून दक्षिण दिशेने (कागल कडून) येणाऱ्या व जाणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता १०:०० ते १०:४५ वाजेपर्यंत व १८:०० ते १८:४५ वाजेपर्यंत या कालावधीत , सिंथेटिक ट्रॅक प्रवेश द्वारातून आत येण्याची व बाहेर पडण्याची सोय केली आहे.

2. महामार्गावरून उत्तर दिशेने (कोल्हापूर शहराकडे) जाणाऱ्या कर्मचाऱ्यांकरिता प्रवेश द्वार क्र. २ (मानव्यशास्त्र नजीक) १८:०० ते १८:४५ वाजेपर्यंत या कालावधीत बाहेर पडण्याची सोय केली आहे.

3. प्रवेश द्वार क्र. १ (बाहेर) १८:०० ते १८:४५ वाजेपर्यंत या कालावधीत सर्व वाहनांकरिता बंद ठेवण्यात येईल.

सिंथेटिक ट्रॅक प्रवेश द्वार निश्चित वेळेच्या बाहेर आदेशाविना उघडले जाणार नाही तरी त्याबाबत सुरक्षा कर्मचार्यांशी वाद घालू नये.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR शिवाजी विद्यापीठ

प्र. कुलसचिव

प्रत:

1. कुलगुरू, प्र-कुलगुरू कार्यालय - माहितीसाठी
2. सर्व अधिकारी - माहितीसाठी
3. सर्व विभाग व अधिविभाग प्रमुख - कर्मचाऱ्यांना सूचित करण्यासाठी
4. इन्टरनेट कक्ष - प्रशासकीय वेबसाईट वर प्रदर्शित करण्यासाठी